International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# सुलतानशाही काळातील स्थापत्य कला

डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार
*Corresponding Author*- डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार
Email- ramakantshatalwar@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.6988526

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासुन भारतात स्थापत्य आणि कला यांचा उदय आणि विकास झाला. मानवाच्या विकासाबरोबर स्थापत्य आणि कलांची निर्मिती आणि विकास झाला. मुहम्मद घौरीचा विश्वासू कुतुबुद्दीन ऐबकाने इ.स. १२०६ ला सुलतानशाहीची स्थापना केली. कुतुबुद्दीन ऐबक, अल्तुतमिश आणि बल्बन हे प्रारंभी दास होते. ट्रान्स, ऑक्सियाना, इराण, अफगाणिस्थान, मेसोपोटेमिया, इजिप्त, उत्तर आफ्रिका, नैऋत्य युरोप व अरेबिया या देशातून आपली खास मुसलमानी शैली आकारास आणली होती. या शैलीची विशेष महत्वपूर्ण अंगे म्हणजे घुमट, उंच मिनारे व कमान ही असतं याच काळात हिंदू स्थापत्यकला उन्नतीच्या परमोच्च शिखरावर पोहोचली होती. सुलतान काळात भारतात अनेक वास्तू बांधल्या गेल्या ही वास्तुशैली इराणी शैली व भारतीय शैली यांचे मिश्रण होऊन सुलतान काळात भारत स्थापत्य क्षेत्र जी शैली विकसीत झाली. तिला 'इण्डो' शैली असे म्हणतात. सुलतान शैली इ.स. १३ व्या शतकापासुन १६ व्या शतकापर्यंत प्रचलित होती. दिल्ली सुलतानाच्या या काळातील वास्तू या आकाराने भव्य व दिव्य बांधणीत मजबुत आहेत.

**विषय निवडणेचा हेतु**

प्रस्तुत विषय निवडणेचा हा सुलतानशाही काळातील स्थापत्य कलेचा अभ्यास करणे.

**गृहितके**

१) सुलतानशाही स्थापत्य कलेची वैशिष्टये मांडणी करणे.

२) सुलतानशाही काळात स्थापत्य कलेचा विकासाची मांडणी करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध-निबंधाच्या मांडणी करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दती, विश्लेषणात्मक संशोधन पध्दती यांचा अवलंब करण्यात येणार आहे. प्राथमिक व दुय्यम साधनाच्या आधारे विविध वेबसाईट आधारे शोध निबंधाची मांडणी करण्यात येणार आहे.

**सुलतानशाहीच्या काळातील स्थापत्यकला**

**कुव्वत-उल-इस्लाम**

'कुतुबुद्दीन ऐबक हा भारतीय पहिला शासक होता. ज्याने मुस्लिम शैलीच्या इमारती बांधल्या. त्यानेच कुव्वत उल इस्लाम ही मशिद बांधली. इ.स.११९५ मध्ये या मशिदीच्या बांधकामास सुरुवात झाली व बांधकाम इ.स. ११९९ मध्ये पुर्ण झाले ही मशिदीच्या बांधकामासाठी आसपासच्या भागातील सत्तावीस हिंदू मंदिरे उद्ध्वस्त करुन त्यांच्या अवशेषांचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामुळे ही मशिद पाहताच क्षणी हिंदू मंदिरासारखीच वाटत होती. पुढे अल्तमश व अल्लाउद्दीन खिलजीने यामध्ये वाढ व सुधारणा करुन मशिदीला मुस्लिम स्वरुप प्राप्त करुन दिले.'[१] कुतुबुद्दीन ऐबकाने दिल्ली जिंकली दिल्ली विजयाच्या प्रित्यर्थ कुव्वत-उल-इस्लाम मस्जिदची स्थापना करण्यात आली. 'कुव्वत उल इस्लाम मशीद ज्याचा अर्थ इस्लामचा पराक्रम आहे. ही सर्वात जुनी आणि प्राचीन मशिदीपैकी एक म्हणुन ओळखली जाते. जी शतकानुशतके टिकून राहिली आणि पाहण्यासाठी एक निश्चित दृश्य आहे दक्षिण दिल्लीतील कुतुब कॉम्प्लेक्सच्या सुंदर आणि प्राचीन विस्ताराच्या आत असलेली भारताची महान मशीद आणि कुतुब मशीद किंवा कुतुब मशिद म्हणुन अनेकजन याला संबोधतात.'[२] 'चौकोनाकृती मस्जिदच्या पश्चिम भागात मेहराब, प्रार्थनेसाठी खुले प्रांगण आहे.'[३] 'राहिलेल्या तिन्ही बाजुला प्रवेशव्दारे आहे. या मशिदीच्या भिंतीवर कलात्मक मेहराब करुन त्यावर कुराणातील वचने खोदलेली आहेत.'[४] 'या मशिदीला ग्रेस्ट्रोनपासुन बनवलेले विशाल तोरण एकुण पाच बेज यांचा समावेश आहे. यात एक प्रचंड मध्यवती कमान आणि तुलनेने लहान बाजुच्या कमानी आहेत, पडदे आणि खांब दोन्ही फुलांची रचना आणि धार्मिक ग्रंथ कोरलेले आहेत.'[५]

**कुतुबमिनार**

'सुलतान काळातील सर्वश्रेष्ठ वास्तु म्हणजे दिल्ली येथील सुप्रसिद्ध कुतुब मीनार होय. कुवत-उल

इस्लाम मशीदीच्या आवारात इ.स. ११९९ मध्ये त्याचे बांधकाम सुरु झाले कुतुबुदिन ऐबकने त्याचा पहिला मजला बाधून झाला नंतर गादीवर आलेल्या इल्तुतमिश याने त्यावर तीन मंजले बांधले व शेवटचा पाचवा मजला फिरोजशहा तुघलकच्या काळात बांधला गेला इ.स. १८०३ मध्ये झालेल्या भयानक भुकंपात त्याचा सर्वात वरचा घुमटाकार भाग कोसळला. कुतुबमीनाराचे खालचे तीन मजले पिवळया वालुकाश्मात व वरचे दोन संगमश्वरी दगडात बांधले आहेत. मिनाराची एकुण उंची २४० फुट आहे त्याचा तळाशी व्यास १३.० मीटर असुन वर तो निमुळता गेला. शेवटी वरचा व्यास ३ मीटर आहे वरपर्यंत जाण्यासाठी आत गोल जीना असुन त्याला एकुण २७९ पायऱ्या आहेत.'[६] 'कुतुबुद्दीन ऐबकाने दिल्लीच्या शेवटच्या राजांचा पराभव झाल्यानंतर लगेच बांधला होता'[७] 'या मिनारचे नाव सुप्रसिद्ध सुफी संत खाजा कुतुबुद्दीनच्या नावावरुन ठेवले आहे.'[८]

**सुलतान घडी**

'सुलतानकाळातील हा पहिला मकबरा होय. यांची निर्मिती अल्तमशचा थोरला मुलगा नासिरुद्दीन याने इ.स. ११३१- इ.स. ११३२ मध्ये केले चारी बाजुला घुमट चौही बाजुने तटबंदी आणि बांधकाम बाह्य बाजुला संगमस्वराचा वापर, इतर कोणत्याही मकबऱ्यापैक्षा वेगळेपण ही याची वैशिष्ठ्ये सांगता येतील.'[९] या मकबरात नासिरुद्दीन महमुद यांचे अवशेष आहेत जो इल्तुतमिशचा मुलगा होता. 'जो बंगालमधील लखनौती येथे युद्ध मोहिमेवर असताना मरण पावला होता.'[१०] 'या घडीची रचना आद्वितीय आहे ते घडी वर रोपण केले आहे हे वाळुच्या दगडाने बनवलेल्या अष्टकोनी छताने झाकलेले आहे आणि संगमस्वराने सुशोभित केलेले आहे. समाधीच्या आजुबाजुला कोपऱ्यातुन विटांनी बांधलेले बुरुज त्याला किल्ल्याचे स्वरुन देतात.'[११]

**अढाई दिन का झोपडा**

'इ.स. १२०० मध्ये ही मशीद अजमेर येथे कुतुबुद्दीन ऐबक याने मोहम्मद घोरीच्या आदेशान्वये बांधली आहे असे म्हणतात की, चव्हाण वंशातील सम्राट विग्रहराज यने स्थापन केलेले संस्कृत विद्यालय मोडुन तेथे ढाई दिन का झोपडा ही मशीद बांधली आहे.'[१२] अढाई दिन का झोपडा राजस्थान मध्ये अजमेर येथे आहे, ही म मशीद बांधण्यासाठी अडीच दिवस म्णजे फक्त ६० तास लागले म्हणुन तिला 'अढाई दिन का झोपडा' असे संबोधले जाते.

**इल्तुतमिश मकबरा:** 'दिल्ली के एक सुल्तान का मकबरा बिना छत का है। ऐसा नही कि छत बनाई नही गई थी। छत बनाई गई थी, लेकिन यह टिक नही पाई। कुछ सालों के बाद फिर से इस मकबरे की छत बनाई गई लेकिन वह भी गिर गई.'[१३] इल्तुतमिशचा मकबरा इ.स. १२४५ ला निर्माण करण्यात आला मिश्र पत्रतीत या मकबऱ्यांची निर्मिती झाली. मकबरा सोळाकोणी असुन त्यावरचा घुमट इस्लामशैलीतील पद्धतीनुसार बांधण्यात आला.

**बल्बरचा मकबरा**

पुर्णत: इस्लाम पद्धतीत बल्बरच्या मकबऱ्याची निर्मिती झाली. चौकोनी आकार असणाऱ्या मकबऱ्याच चारही बाजुला ०४ प्रवेश व्दारे आहेत. 'बलबनचा मकबरा भारतात नवी वासतुशैली घेऊन आला होता. भारतातले पहिले खरे कमान आणि घुमट शैलीचे बांधकाम म्हणजे बलबनचा मकबरा यांचे श्रैय बलबनला द्यावे लागेल कारण मुसलमान शासक जिवंत पणीच स्वत:चा मकबरा बनवुन ठेवत त्यात सुल्तान बल्बन अपवाद नाही.'[१४] हा मकबरा महरौली नवी दिल्ली येथे आहे.

**महराब**

'महराब म्हणजे दरवाजाच्या वर अर्धगोलाकार भाग होय. सुलतान काळात निर्माण झालेल्या किल्ले, मकबरे, मजीद, महल आणि मिनारात मेहराब-गुमट यांचा प्रयोग केला गेला. 'इल्तुतमिशने दिल्लीतील कुव्वत उल इस्लाम मस्जिदीत महराब बांधले.'[१५] महराब शब्दाचा मुळत: गैर धार्मिक अर्थ होता. आणि तो फक्त घरातील एका विशिष्ट खोलीला सुचित करतो. महराब दगड आणि विटा पासुन बनवला जात असे.

**निकर्ष**

सुलतान काळात सुलतानानी अमीर, सुफी संत याच्या स्मरणात मकबरे निर्माण करण्यची परंपरा ही सुरुवात केली सुलतान काळात वास्तु मजबुत बनविण्यासाठी संगमश्वर, दगड आणि चांगल्या दर्जचा चुना यांचा उपयोग केला गेला. सुलतान काळात वास्तुमध्ये, मेहराब आणि गुंबद याचा प्रयोग केला गेला. सुल्तान काळात 'अरबस्क विधि' ची सुरुवात झाली. ही विविध अंलकरण करण्याची मिश्रीत पद्धती होती. सुल्तान स्थापत्य कला हा विकासाची पहिली अवस्था मानली जाते. कारण हि हिंदु शैलीचा त्याच्यावर प्रभाव होता. सुलतान काळातील स्थापत्य कला मध्ये भारतीय आणि ईराणी शैलीचे मिश्रण आहे. दिल्ली सुलतानांनी बांधलेल्या सर्व इमारती आकाराने भव्य लाल दगडांचा

वापर केलेला आहे, उंच मिनाट, छोटे-मोटे घुमट, मेहराबयुक्त प्रवेशद्वार, इमारतीच्या आत मोठे पटांगण, वेलपट्या, जाळया, रंगीन विटा, नकली खिडकी, कोरीव काम इ. महत्वपुर्ण वैशिष्ट्ये स्थापत्य कलेतुन दिसुन येते.

**संदर्भ**


1. डॉ. अरविंद सोनटक्के, डॉ. नभा अनिल काकडे, डॉ. धम्मपाल माशाळकर (२०१९) भारतीय कलावैभव, संकल्प प्रकाशन, सोलापुर पु. १३४,१३५
2. delhiinformation.in
3. प्रशांत देशमुख (२००३), भारताचा इतिहास, विद्याभारती प्रकाशन, प्रथम आवृती, लातुर, पु.३४५
4. डॉ. अरविंद सोनटक्के, डॉ. नभा अनिल काकडे, डॉ. धम्मपाल माशाळकर (२०१९) भारतीय कलावैभव, संकल्प प्रकाशन, सोलापुर पु. १३५
5. www.holidify.com
6. प्रा. श्री ह शहाणे (२००४) भारतीय कलेचा इतिहास, गांगल पब्लिकेशन्स, अकरावी आवृती मुंबई, पु.१७७
7. www.delhitourism.gov.in
8. डॉ. अरविंद सोनटक्के, डॉ. नभा अनिल काकडे, डॉ. धम्मपाल माशाळकर (२०१९) भारतीय कलावैभव, संकल्प प्रकाशन, सोलापुर पु. १३६
9. प्रो. डॉ. अनिल सिंगारे, प्रा. डॉ. ओमशिवा लिगाडे (२०२०) भारताचा इतिहास अरुणा प्रकाशन, प्रथम आवृती, नांदेड, पु. ३७३
10. www.tripadvisor.in
11. www.yatra.com
12. डॉ. अरविंद सोनटक्के, डॉ. नभा अनिल काकडे, डॉ. धम्मपाल माशाळकर (२०१९) भारतीय कलावैभव, संकल्प प्रकाशन, सोलापुर पु. १३६
13. ई-पेपर नवभारत टाइम्स, २३ सप्टेबर २०१९
14. www.misalpav.com
15. प्रशांत देशमुख (२००३), भारताचा इतिहास, विद्याभारती प्रकाशन, लातुर, पु.३४६